# सामाजिक संस्थांची कामगिरी सरस

म. टा. विशेष प्रतिनिधी, मुंबई



आरोग्याच्या क्षेत्रात यंत्रणांसोबत सामाजिक संस्थादेखील जनजागृती तसेच प्रत्यक्ष कार्यक्रम राबवण्यासाठी मोलाची मदत करतात. लसीकरणाबद्दलचे गैरसमज दूर करून संसर्ग नियंत्रणात ठेवण्यासाठी धारावीमध्ये सामाजिक संस्थांनी अशीच सरस कामगिरी केली आहे.

विविध सामाजिक संस्थांच्या सहभागाने धारावीत राबवलेल्या लसीकरण मोहिमेत ५९,२६९ लाभार्थ्यांचे लसीकरण करण्यात आले. इतर कोणत्याही प्रभागापेक्षा धारावीत सामाजिक संस्थांच्या सहभागाने करण्यात आलेल्या लसीकरणातील लाभार्थ्यांची संख्या अधिक असल्याचे दिसते. सामाजिक संस्थांची या प्रभागातील कामगिरी समाधानकारक असल्याचे जी उत्तर प्रभागाचे सहाय्यक आयुक्त किरण दिघावकर यांनी सांगितले.

जसलोक रुग्णालयाने काही बँकांच्या मदतीने येथे राबवलेल्या सीएसआर कार्यक्रमांतर्गत पहिली मात्रा देण्यात आली. पुन्हा एक लाख मात्रांची उपलब्धता करण्यात येणार आहे. उज्ज्वल मंडळ, चिंतामणी सेवा संस्था, जयस्तूस्वराज्य प्रतिष्ठान, मुस्कान फाऊंडेशन, कम टुगेदर फाऊंडेशन, स्नेहा, शेड, मॅजिक बस, वर्ल्डव्हिजन, बीजेएस यासारख्या संस्थांनी आयोजित केलेल्या लसीकरणाचा सामान्यांनी लाभ घेतला.

## लसीकरणाबद्दलचे गैरसमज दूर करण्यास हातभार

धारावीची लोकसंख्या सव्वा सहा लाख असून यात पन्नास टक्के लाभार्थ्यांनी पहिली मात्रा घेतली आहे. सर्वसामान्यांसाठी लसीकरण सुरू झाल्यानंतरही त्याचा लाभ धारावीकरांनी तत्परतेने घेतला नव्हता. लसीकरणाबद्दल मनामध्ये अनेक गैरसमज होते. या संस्थांनी ते दूर करण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले. त्यामुळे लसीकरणाचा वेगही वाढला. पहिली मात्रा घेतल्यानंतर सीएसआरमध्ये दुसरी मात्रा मिळेल का अशी शंका काहीजणांच्या मनात होती. मात्र ती उपलब्धताही झाली आहे.

आता लो. टिळक रुग्णालयाने दोन लसीकरण केंद्रांची उपलब्धता केली आहे. ज्या शाळांमध्ये लसीकरण केंद्रे होती तिथे पर्यायी व्यवस्था करण्यात आल्याचे पालिका रुग्णालयाचे संचालक डॉ. रमेश भारमल यांनी सांगितले.